॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

पत्र पेटी क्र. ८०, जळगाव -४२५००१

## जाहीर प्रकटन

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता अद्ययावत केलेल्या सुधारीत आराखडा भाग १ मध्ये दर्शविल्याप्रमाणे **शैक्षणिक वर्ष २०१८-२०१९** साठी उमवि अधिक्षेत्रात नवीन महाविद्यालय/परिसंस्था सुरु करणेसाठी दिनांक ३० सप्टेंबर, २०१७ किंवा तत्पूर्वी ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करणेसाठी विद्यापीठातर्फे यापूर्वीच जाहीर आवाहन करण्यात आले होते, त्यानुसार प्राप्त प्रस्तावांवर पुढील अनुषंगिक कार्यवाही देखील विहीत कालावधीत केलेली आहे.

तद्‌नंतर महाराष्ट्र शासन राजपत्र-असाधारण भाग-चार, दि. २८ नोव्हेंबर, २०१७ नुसार (उच्च व तंत्रशिक्षण विभाग) यांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम २०१६ यात सुधारणा करण्याकरीता प्रसिध्द केलेल्या अध्यादेशामधील मुद्दा क्र. ५ मध्ये महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम २०१६ च्या कलम १०९ च्या पोटकलम (३) मध्ये खंड (क) (ग) (घ) मध्ये सुधारणा केलेली आहे.

सदर राजपत्र तथा महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दि.३०/११/२०१७ च्या पत्रात नमूद केल्यानुसार, शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या अद्ययावत केलेल्या सुधारीत बृहत आराखडा भाग-१ मध्ये नवीन महाविद्यालय/परिसंस्थांसाठी नमूद केलेल्या बिंदू करीता नवीन महाविद्यालय/परिसंस्था (कौशल्य विकास महाविद्यालय वगळता) सुरु करण्यासाठी इच्छुकांनी **दि. १५ डिसेंबर, २०१७ किंवा तत्पूर्वी** ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव सादर करावेत असे विद्यापीठातर्फे जाहिर आवाहन करण्यात येत आहे.

परंतु ज्या संस्थांनी यापूर्वी विद्यापीठाकडे अर्ज सादर केलेले असतील, अशा संस्थांनी पुन्हा अर्ज सादर करण्याची आवश्यकता राहणार नाही. मात्र अशा संस्थांनी यापूर्वी सादर केलेले अर्ज विचारात घेतले जातील, याची नोंद घ्यावी.

उपरोक्त नमूद केलेले अर्ज ऑनलाईन पध्दतीने सादर करणेसाठी विस्तृत स्वरुपातील माहिती विद्यापीठाच्या **www.nmu.ac.in** या संकेतस्थळावर Homepage वरील BCUD मधील Affiliation वर pointer ठेऊन त्यातील Online Affiliation या Link वर click करुन **Proposal Guidelines 2018-19** येथे उपलब्ध असून अर्ज भरतेवेळी helpline देण्यांत आलेली आहे. शासनाने यासंदर्भात वेळोवळी निर्गमित केलेले शासन निर्णय, विद्यापीठाचा अद्ययावत सुधारीत बृहत आराखडा, संलग्नता शुल्काचा तक्ता, प्रक्रिया आदि शुल्काचे परिपत्रक, वेळापत्रक व इतर सविस्तर माहिती आणि संबंधित परिपत्रके त्याचठिकाणी **Important G.R/ Circulars** आणि **Other G.R./Circulas** या Link वर उपलब्ध करुन देण्यांत आलेली आहेत.

तरी उपरोक्त Link मध्ये नमूद केलेल्या सूचनांचे अवलोकन करुन त्यानुसार ऑनलाईन प्रणालीव्दारे परिपूर्ण अर्ज भरुन त्याची हार्ड कॉपी आवश्यक तेवढ्या प्रतींत आवश्यक त्या कागदपत्र व शुल्कासह दिनांक 15 डिसेंबर, 2017 किंवा तत्पूर्वी संलग्नता विभागात समक्ष सादर करावेत. सुधारीत बृहत आराखड्याशी सुसंगत नसलेला कोणताही अर्ज विचारात घेतला जाणार नाही. तसेच अपूर्ण भरलेले, अपूर्ण दस्तऐवज असलेले ,साक्षांकीत कागदपत्र नसलेले व मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

**अटः-** विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता अद्ययावत केलेला सुधारीत शासनमान्य बृहत आराखड्यास शासनाच्या महाराष्ट्र शासन, उच्च शिक्षण व विकास आयोगाच्या (MAHED) नियुक्त तज्ञ समितीच्या शिफारशी तसेच माहेडच्या अंतिम मंजूरीस अधिन राहून तसेच नवीन मान्यतांसाठी आवश्यक निकषां संदर्भात शासनाकडून प्राप्त होणाऱ्या आदेशास अधिन राहून पात्र अर्जाचा विचार केला जाईल. त्यासंदर्भात शासनाकडून जे आदेश/सूचना प्राप्त होतील, त्यानुसार अर्जांवर कार्यवाही करण्यांत येईल, याची नोंद घ्यावी.

ठिकाण :-जळगांव

दिनांक :- ०६.१२.२०१७

**(प्रा.डॉ. पी.पी.माहुलीकर)**
**विशेष कार्य अधिकारी, संलग्नता विभाग**

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव - ४२५००१

NORTH MAHARASHTRA UNIVERSITY, JALGAON– 425001

'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

जा.क्र.उमवि/५/ संलग्नीत महा.प्रस्ताव-२०१८.१९/५७३/२०१७ दि. ०६/१२/२०१७

## परिपत्रक

## नवीन महाविद्यालये सुरु करणेसाठी इच्छुक असलेल्या विविध शैक्षणिक संस्थांकरीता

प्रति,

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव अंतर्गत,

नवीन महाविद्यालये सुरु करणेसाठी इच्छुक असलेल्या विविध शैक्षणिक संस्थाचे,

मा.अध्यक्ष/संचालक मंडळ...

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून नवीन महाविद्यालय सुरु करणेसाठी प्रस्ताव/अर्ज सादर करणेबाबत..

संदर्भ :- ०१) महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे पत्र क्र. बृआमा २०१७/प्र.क्र.३७६/विशि-३, दि. ०८/०९/२०१७

०२) महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे पत्र क्र. बृआमा २०१७/प्र.क्र.३७६/विशि-३, दि. ११/०९/२०१७

०३) महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडील शासन निर्णय क्र. एनजीसी-२०१७/(२९/१७)/मशि-४, दि. १५/०९/२०१७

०४) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग-चार, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, दि.२८ नोव्हेंबर २०१७

०५) महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे पत्र क्र. बृआमा-२०१७/प्र.क्र.३७६/विशि-३, दि. ३०/११/२०१७

महोदय/महोदया,

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम २०१६ चे कलम १०७,१०८,१०९,११०,१११ व ११४ मध्ये नमूद केलेल्या तरतुदीनुसार आणि संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने तसेच विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता अद्ययावत केलेला सुधारीत तसेच शासनमान्य बृहत आराखडा भाग-१ यास महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाच्या (MAHED) नियुक्त तज्ञ समितीच्या शिफारशी तसेच MAHED च्या अंतिम मंजूरीस अधिन राहून तसेच नवीन मान्यतांसाठी आवश्यक निकाषांसंदर्भात शासनाकडून वेळोवेळी प्राप्त होणा-या आदेशाच्या अधिन राहून शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून उच्च शिक्षणाचे नवीन महाविद्यालय किंवा परिसंस्था सुरु करण्याकरीता शासनाकडून इरादा पत्र मागविणेसाठी इच्छुक असलेल्या शैक्षणिक संस्थांकडून वरील संदर्भिय ४ व ५ च्या अनुषंगाने दि. १५/१२/२०१७ पर्यत प्रस्ताव/अर्ज मागविण्यात येत आहेत. उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयामध्ये तसेच नवीन मान्यतांसाठी आवश्यक निकषां संदर्भात शासनाकडून प्राप्त होणा-या आदेशांमध्ये नमूद केलेल्या कार्यपध्दतीनुसार आणि महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम २०१६ च्या तरतुदींनुसार प्राप्त अर्जांवर विद्यापीठाव्दारे योग्य ती कार्यवाही करुन पात्र प्रस्ताव/अर्ज विद्यापीठाच्या शिफारशींसह शासनाकडे मान्यतेसंदर्भात पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित करण्यात येतील आणि उर्वरीत अर्जांवर प्रचलित नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

<u>उपरोक्त संदर्भात आपणास कळविण्यात येते की:-</u>

१) विद्यापीठाच्या असे निदर्शनास आले आहे की, बऱ्याचदा भरलेल्या माहितीची खातरजमा न करता अपूर्ण भरलेली/अद्ययावत न केलेली माहिती ऑनलाईन प्रणालीमार्फत submit करुन Sent to University करण्यात येते. त्यामुळे वेळोवेळी सदरची माहिती पुन:श्च भरणेसाठी/अद्ययावत करणेसाठी Academic Information/ Proposal Link, unlock करावी लागते. त्यामुळे तांत्रिक अडचणी निर्माण होतात. (उदा- अपूर्ण भरलेल्या माहितीची हार्ड कॉपी सादर करण्यात येते. तथापि, unlock केल्यानंतरची सुधारित माहिती ऑनलाईन प्रणालीमार्फत Sent to University केली जात नाही व सुधारीत हार्ड कॉपी सादर करण्यात येत नाही) तसेच संभ्रम निर्माण होतो. तरी याबाबत आपणांस कळविण्यात येते की, आपण भरलेल्या/अद्ययावत केलेल्या माहितीची खातरजमा करुनच त्याबाबत पुढील कार्यवाही करावी.

२) विद्यापीठाच्या परिपत्रक क्र.उमवि/५/६७९/२०१२, दिनांक ०१/१०/२०१२ मध्ये नमूद केलेल्या तक्त्यातील रकान्यांप्रमाणे नवीन महाविद्यालयांसाठी लागू असलेले प्रक्रिया शुल्क अगोदर भरणे आवश्यक आहे. त्यानंतरच आपणांस नवीन महाविद्यालयाच्या अर्जासाठीची Link Activate होईल व आपणास अर्ज ऑनलाईन प्रणालीमार्फत भरता येईल. त्यामुळे सदरचे शुल्क हे लवकर/तातडीने भरावे व भरलेला प्रस्ताव/अर्जाची प्रत, आवश्यक ते कागदपत्र व संलग्नता शुल्क विद्यापीठाच्या संलग्नता विभागास दि. १५/१२/२०१७ पावेतो कार्यालयीन वेळेत सादर करता येईल.

३) **संलग्नता शुल्काबाबतचे परिपत्रक, संलग्नता शुल्काचा तक्ता आदि माहिती ऑनलाईन ॲफिलिएशन (OASIS) मधील Downloads या Link वर तसेच विद्यापीठाच्या संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहे.**

४) ज्या शैक्षणिक संस्थांना विद्यापीठाच्या बृहत आराखडयास माहेड ज्या अंतिम मंजूरीस अधिन राहून नवीन महाविद्यालये सुरु करण्यासाठी बृहत आराखडयानुसार प्रस्ताव सादर करावयाचे आहेत, त्यांनी विहीत नमुन्यातील अर्ज ऑनलाईन प्रणालीव्दारे भरावयाचे असून, ऑनलाईन पध्दतीने माहिती भरल्यानंतर त्याची प्रिंट घेऊन सदर प्रस्ताव <u>**०७ प्रतीत आवश्यक ते साक्षांकित केलेले कागदपत्र व संलग्नता शुल्कासह**</u> विद्यापीठाच्या संलग्नता विभागास दि. १५/१२/२०१७ पावेतो कार्यालयीन वेळेत सादर करावेत.

५) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम २०१६ मधील कलम १०९(२) नुसार, विद्यापीठाने कलम १०७अन्वये तयार केलेल्या सम्यक योजनेशी (बृहत आराखडा) सुसंगत नसेल, असे उच्च शिक्षणाचे नवीन महाविद्यालय किंवा परिसंस्था सुरु करण्यासाठीचा कोणताही अर्ज विद्यापीठाकडून विचारात घेतला जाणार नाही.

तरी आपणास कळविण्यांत येते की, आपण आपले अर्ज ऑनलाईन प्रणालीमार्फत भरुण आवश्यक त्या कागदपत्रांसह अर्जाची हार्ड कॉपी (सदर परिपत्रकात नमूद केलेल्या प्रतीत) दि. १५/१२/२०१७ पावेतो संलग्नता शुल्कासह विद्यापीठाच्या संलग्नता विभागात सादर करावी, ही विनंती.

उपरोक्त नमूद केलेले अर्ज ऑनलाईन पध्दतीने सादर करण्यासाठी विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर Homepage वरील BCUD या टॅग मधील Affiliation या मेनूवर pointer ठेऊन त्यातील Online Affiliation या Link वर click करुन Proposal Guidelines 2018-19 येथे Click करावे. सदर Link मध्ये आवश्यक त्या सर्व सूचना देण्यात आलेल्या असून त्या सूचनेनुसार ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करावेत. आपल्या माहितीसाठी सदर ठिकाणी Helpline मॉडयुल देखील देण्यात आलेली आहे. तसेच शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, संलग्नता शुल्काचा तक्ता, प्रक्रिया शुल्काचे परिपत्रक व इतर सविस्तर माहिती आणि संबंधित परिपत्रके Important G.R/ Ciculars तसेच Other G.R/Circulars या Link वर उपलब्ध आहेत.

..३..

**ऑनलाईन प्रणालीव्दारे माहिती भरतांना वा आपणांस काही अडचणी असल्यास सदर अडचणींचे निराकरण करण्यासाठी वर नमूद केलेल्या Link वर helpline देण्यात आलेली असून आपण त्या ठिकाणी देण्यांत आलेल्या दूरध्वनी/मोबाईलवर संपर्क साधल्यास आपल्या अडचणींचे तात्काळ निराकरण केले जाईल.**

नवीन महाविद्यालयांचे प्रस्ताव सादर करण्यासाठी वर नमूद केलेल्या Link मधील सूचना तसेच या पत्रासोबत जोडलेल्या सूचनांचे अवलोकन करावे ही विनंती. नवीन महाविद्यालयांचे प्रस्ताव विद्यापीठात सादर करण्याची मुदत, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम २०१६ चे कलम १०९ नुसार दि. ३० सप्टेंबर अशी आहे. तथापि, वरील संदर्भांकित क्र. ४ व ५ च्या अनुषंगाने शासनाने दिलेल्या निर्देशानुसार सदरचे प्रस्ताव दि. १५/१२/२०१७ पावेतो स्विकारण्यात येणार आहेत. **तसेच ज्या संस्थांनी यापूर्वी विद्यापीठाकडे नवीन महाविद्यालयासाठी दि. ३०/०९/२०१७ पर्यंत अर्ज सादर केलेले आहेत, अशा संस्थांनी पुनश्चः अर्ज सादर करण्याची आवश्यकता राहणार नाही. अशा संस्थांनी यापूर्वी सादर केलेले अर्ज विचारात घेतलेले आहेत. याची कृपया नोंद घ्यावी.**

Sd/-
**(भ.भा.पाटील)**
कुलसचिव
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ

सोबत : अर्ज सादर करणेसाठी आवश्यक त्या सूचना व माहिती.

## ऑनलाईन प्रणालीव्दारे अर्ज सादर करणेसाठी आवश्यक त्या सूचना व माहिती

१) Proposal Guidelines २०१८-१९ मध्ये विविध प्रस्तावांच्या Links देण्यात आलेल्या आहेत. त्यातील New Colllege या **Link वर click करुन त्याठिकाणी उपलब्ध असलेला अर्ज Download करुन त्याची Print काढावी व सदर अर्जातील संपूर्ण माहिती भरुन अर्ज प्रक्रिया शुल्कासह संलग्नता विभागास सादर करावा. त्यानंतर आपणास हव्या असलेल्या अर्जासाठीची Link Activate होईल आणि ऑनलाईन प्रणालीमार्फत प्रस्ताव अर्जातील माहिती भरता येईल.** ऑनलाईन अर्ज सादर करतेवेळी परिपत्रकात नमूद केलेल्या Link मधील सूचनांचे अवलोकन केल्यानंतरच अर्ज भरावा. अर्ज भरतेवेळी आवश्यक ते दस्तऐवज जवळ ठेवल्यास सदर अर्जातील माहिती भरणे सुकर होईल.

२) आपणांस लागू असलेल्या अर्जाची माहिती आपण ऑनलाईन प्रणालीव्दारे भरावी व त्याची A-4 साईज पेपरवर एकाच बाजूने प्रिंट घेऊन (परिपत्रकात नमूद केलेल्या प्रतीत) त्यासोबत आवश्यक ते साक्षांकित केलेले कागदपत्र, सहपत्र, विहीत केलेल्या संलग्नता शुल्कासह प्रस्ताव/अर्ज वेळापत्रकाप्रमाणे सादर करावा. या प्रक्रियेव्दारे जमा करण्यांत येणा-या शुल्काचा (प्रक्रिया/संलग्नता शुल्क) धनाकर्ष वित्त व लेखा अधिकारी, उ.म.वि.जळगाव (Finance & Accounts Officer,NMU, Jalgaon) यांचे नावे राष्ट्रीयकृत बॅंकेचा असावा.

३) उपरोक्त फाईलमध्ये ऑनलाईन पध्दतीने भरलेली तपासणी सूची, प्रस्ताव अर्जाची प्रत व त्यानंतर साक्षांकित केलेले कागदपत्र/सहपत्र जोडावीत. (संदर्भिय शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे व संकेतस्थळावरील ऑनलाईन अर्जात तसेच तपासणी सूचीत नमूद केलेले) धनाकर्ष हा अर्जाच्या वर टाचणीने जोडावा.

४) आपला अर्ज अचूक व परिपूर्णपणे सादर करण्याच्यादृष्टीने महाविद्यालयातील/परिसंस्थेतील ज्या कर्मचारी/प्रतिनिधींना अर्जाबाबत सखोल माहिती आहे, अशाच कर्मचारी/प्रतिनिधींना अर्ज सादर करतेवेळी समक्ष पाठविणे आवश्यक आहे.

५) **प्रक्रिया शुल्क भरल्यानंतर ऑनलाईन प्रणालीमार्फत अर्ज/प्रस्ताव भरला म्हणजे विद्यापीठास अर्ज/प्रस्ताव सादर केला असा त्याचा अर्थ होणार नाही. तर ऑनलाईन प्रणालीमार्फत परिपूर्ण स्वरुपात भरलेल्या अर्जाची हार्ड कॉपी आवश्यक त्या साक्षांकित केलेल्या कागदपत्रांसह व संलग्नता शुल्कासह विद्यापीठाच्या संलग्नता विभागास जमा करुन त्याची नोंद घेतल्यानंतरच अर्ज/प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे, असे समजण्यात येईल.**

तरी संबंधित शैक्षणिक संस्थांनी, महाविद्यालयांनी/परिसंस्थांनी उपरोक्त नमूद केलेल्या सर्व सूचनांचे तंतोतंत पालन करुन त्यानुसार अर्ज तयार करुन सादर करावेत. विलंबाने पोहोचणारे प्रस्ताव व शुल्क, कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी.

Sd/-
(भ.भा.पाटील)
कुलसचिव
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ

प्रत माहिती तथा कार्यवाहीस्तव:-

**मा.वित्त व लेखा अधिकारी, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**